नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - १०६<br>Issue - 106 | वार - गुरुवार दि. १० सप्टेंबर २०२६<br>Blow- Thursday Date 10 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## मुंढवा जमीन घोटाळ्यात पार्थ पवारांना आरोपी का केले नाही?

### उच्च न्यायालयाने पोलीस महासंचालक, तपास अधिकाऱ्याला दिले स्पष्टीकरणाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंढवा जमीन घोटाळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार पार्थ पवार यांना आरोपी का करण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने पोलीस महासंचालक आणि तपास अधिकाऱ्याला दिले आहेत. पोलीस महासंचालकांनी स्वतः याबाबतचे उत्तर प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणातील दोन आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी करताना न्या. माधव जामदार यांच्या एकल पीठाने बुधवारी हे आदेश दिले.

मुंढवा येथील सुमारे ४० एकर जमीन अमेडिया कंपनीने बाजारभावापेक्षा कमी किमतीत खरेदी केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. या व्यवहाराच्या वेळी दिग्विजयसिंह पाटील आणि पार्थ पवार हे कंपनीचे संचालक होते. मात्र, प्रकरणात एकट्या पाटील यांनाच आरोपी करण्यात आले असून पार्थ पवार यांना आरोपी करण्यात आलेले नाही, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. पार्थ पवार हे प्रभावशाली व्यक्ती असून ते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र आहेत. त्यांच्या प्रभावामुळे त्यांना या प्रकरणात आरोपी करण्यात आले नसल्याचा दावा सुनावणीदरम्यान करण्यात आला. या मुद्द्याची न्यायालयाने दखल घेत तपास यंत्रणेकडून स्पष्टीकरण मागविले आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन आठवड्यांत या संदर्भातील उत्तराचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याची हमी देण्यात आली. त्याची नोंद घेत न्यायालयाने पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी ठेवली आहे.





या प्रकरणातील सूर्यकांत येवले आणि कुंदन गायकवाड यांनी अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला आहे. या जमीन व्यवहारातील घोटाळ्यात आपला कोणताही सहभाग नसल्याचा दावा दोघांनी केला. मात्र, हे दोघेही कथित गैरव्यवहारात सक्रियपणे सहभागी असल्याचा युक्तिवाद राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने येवले आणि गायकवाड यांना अटकेपासून यापूर्वी मिळालेले संरक्षण पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवले आहे.


१ हजार ८०० कोटींच्या जमिनीचा ३०० कोटींमध्ये व्यवहार

मुंढवा जमीन प्रकरणातील व्यवहाराच्या किंमतीवरूनही प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित जमिनीची किंमत सुमारे १ हजार ८०० कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या जमिनीचा व्यवहार ३०० कोटी रुपयांमध्ये झाल्याची माहिती समोर आली. या व्यवहारात सुमारे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. या प्रकरणात पार्थ पवार यांना यापूर्वी क्लिन चिट देण्यात आली होती. मात्र, आता उच्च न्यायालयाने त्यांना आरोपी का करण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण पोलीस महासंचालकांकडून मागविल्याने या प्रकरणाला पुन्हा महत्त्व आले आहे.

## 'एसआयआर' प्रक्रियेनंतर मतदार यादीवर दावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण-२०२६ अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या असून, नवमतदारांसह मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांना या कालावधीत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे.



मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना-६ मध्ये अर्ज करता येणार आहे. मतदार यादीतील एखाद्या नावाच्या समावेशावर हरकत असल्यास संबंधित मतदारसंघातील मतदाराला नमुना-७ मध्ये अर्ज करता येईल. याशिवाय मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती, मतदार ओळखपत्र बदलणे किंवा दिव्यांग चिन्हांकनासाठी नमुना-८ मध्ये अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदारसंघाच्या आत स्थलांतर झाल्यामुळे पत्ता बदलायचा असल्यासही नमुना-८ मध्ये अर्ज करता येणार आहे. त्याचप्रमाणे मतदारसंघाबाहेर स्थलांतर झालेल्या मतदारांसाठीही पत्ता बदलाची स्वतंत्र नोंद नमुना-८ अंतर्गत करता येणार असल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

दावे आणि हरकती दाखल झाल्यानंतर त्यासंदर्भातील यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर सात दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यावर त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे. सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेत दाखल झालेल्या दावे-हरकतींचा तपशीलही निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाणार आहे.

खोटी माहिती दिल्यास तुरुंगवास

दरम्यान, मतदार यादीच्या पुनरिक्षणाच्या अनुषंगाने किंवा मतदार यादीतील नोंदींबाबत खोटे विधान अथवा घोषणा करणाऱ्यांविरुद्ध कारवाईची तरतूद आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम ३१नुसार अशा व्यक्तीस एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, असे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवशी आदिवासी बांधवांना मिळणार जमिनींची कायदेशीर मालकी; गांधी जयंतीपर्यंत राज्यभर मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात पिढ्यानपिढ्या जमिनीचा ताबा असूनही वनपट्टा न मिळालेल्या अथवा प्रत्यक्ष वहिवाटीपेक्षा अपुरा किंवा अर्धाच वनपट्टा मिळालेल्या सर्व आदिवासी बांधवांना जमिनीचा कायदेशीर मालकी हक्क देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ (राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती) या कालावधीत राज्यभरात हे विशेष कालबद्ध अभियान राबवले जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली.

अनेक आदिवासी बांधव जास्त जमिनीवर शेती करत आहेत, मात्र त्यांना १.१ किंवा अर्धाच वनपट्टा मिळाला आहे. तर काही शेतकरी जमिनीवर शेती करत असूनही त्यांना अद्याप वनपट्टा मिळालेलाच नाही. अशा सर्व वंचित आणि अपूर्ण वनपट्टाधारक आदिवासी शेतकऱ्यांचे प्रलंबित दावे निकाली काढून त्यांना अधिकारपत्र देण्यासाठी ही राज्यस्तरीय मोहीम सुरू करण्यात येत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. ज्या आदिवासी शेतकऱ्यांच्या ताब्यात शेतजमीन आहे, पण वनपट्टा मिळालेला नाही किंवा अपुरा मिळाला आहे, त्यांच्या दाव्यांवर विचार करून ते मंजूर करण्यासाठी सलग तीन दिवस ग्रामस्तरीय वनहक्क समित्यांच्या बैठका होतील. ग्रामस्तरीय समितीने मंजूर केलेल्या दाव्यांना अधिकृत मान्यता देण्यासाठी ३० सप्टेंबर, १ ऑक्टोबर आणि २ ऑक्टोबर रोजी विशेष ग्रामसभा आयोजित केल्या जातील. ग्रामसभेची मंजुरी मिळाल्यानंतर हे प्रस्ताव उपविभागीय व जिल्हास्तरीय वनहक्क समित्यांकडे पाठवून निश्चित मुदतीत त्यांना अंतिम मान्यता दिली जाईल.

### राज्यातील अपूर्ण वनपट्टाधारक आदिवासी शेतकऱ्यांसाठी 'विशेष कालबद्ध अभियान'

या अभियानांतर्गत वनपट्टा मंजूर होताच सर्व आदिवासी शेतकऱ्यांना नवीन प्रॉपर्टी कार्ड, ७/१२ आणि नमुना १२ (बारा) उपलब्ध करून दिले जातील. तसेच ज्या आदिवासी शेतकऱ्यांना आधीच वनपट्टा मिळालेला आहे, त्यांना '६ ते १२' उतारे दिले जातील. राज्यातील एकही आदिवासी शेतकरी ज्याच्याकडे शेतजमीन आहे पण प्रॉपर्टी कार्ड किंवा ७/१२ नाही, असा सुटणार नाही. सर्वांना या मोहिमेचा लाभ दिला जाईल असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला. अभिलेखीव किंवा तांत्रिक त्रुटींमुळे कोणताही पात्र आदिवासी शेतकरी वनहक्कापासून वंचित राहणार नाही किंवा त्याचा दावा नाकारला जाणार नाही, याची कठोर दक्षता घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून राज्यभर भक्तांची मोफत आरोग्य तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमात नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य तपासणीची सुविधा मिळावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तपासणीदरम्यान आरोग्यविषयक समस्या आढळल्यास संबंधितांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, शहरी आरोग्य आयुक्तालय, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचाराचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे.

गेल्यावर्षी दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित १२ हजार ६५५ आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४ हजार ७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १८ हजार ८०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते. तसेच २३६ रक्तदान शिबिरांमध्ये १६ हजार ७९८ नागरिकांनी रक्तदान केले होते. या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गरजेनुसार पुढील तपासणी व उपचारासाठी रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. आजारांचे वेळेत निदान होऊन गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात येणार आहे. यंदा २० लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीच्या बैठकीत निर्णय

## ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्यास मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ऊस गाळप हंगामाचे सन २०२६-२७ बाबत धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री समितीची बैठक झाली. या बैठकीत यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील ऊस उपलब्धता, गाळपाचे नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना मिळणारा ऊसदर तसेच साखर कारखान्यांसमोरील विविध आर्थिक व तांत्रिक बाबींचा बैठकीत सविस्तर आढावा घेऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताचा समतोल साधून आगामी गाळप हंगामाचे नियोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताचा समतोल साधून गाळप हंगामाचे नियोजन

२०२५-२६ गाळप हंगामाचा आढावा, देशातील साखर साठा, थकीत एफआरपी व आरआरसी, सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल पुरवठा, ऊस क्षेत्र व उत्पादन, साखर निर्मिती तसेच २०२६-२७ च्या गाळप हंगामाची पूर्वतयारी,हंगाम निहाय एफआरपी व एमएसपी, साखर उद्योगाशी संबंधित शासनाच्या विविध उपक्रमांसाठी कारखान्यांकडून करण्यात येणाऱ्या कपातीचे धोरण आणि गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाच्या निधी कपातीचा आढावा,प्रलंबित देणी भागविण्यासाठी सॉफ्ट लोन योजनेवरील व्याज अनुदान सुरू करणे, ज्या साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्पांशी संबंधित वीज खरेदी करार संपुष्टात आले आहेत, अशा कारखान्यांना २०२३-२४ च्या हंगामाप्रमाणे प्रति युनिट १.५० रुपये सबसिडी देणे, साखर पॅकिंगसाठी ज्युट बॅगची सक्तीची अट शिथिल करणे, सीबीजी निर्मिती प्रकल्पांना आर्थिक व तांत्रिक प्रोत्साहन देणे, ऊस उत्पादन वाढीसाठी विशेष ऊस विकास योजना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित ऊस वाण, रोपवाटिका, ऊस बेणे प्रक्रिया, ठिबक सिंचन, रासायनिक व सेंद्रिय खतांचा संतुलित वापर, आधुनिक ऊस लागवड पद्धती आणि यांत्रिकीकरण यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष ऊस विकास योजना लागू करण्याबाबत सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी बैठकीत सादरीकरण केले.

केंद्राकडे प्रलंबित विषयांबाबत शिफारस

साखर उद्योगासंदर्भातील केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या विषयांवरही बैठकीत चर्चा झाली. त्यामध्ये साखरेच्या किमान विक्री किंमतीत वाढ करणे, इथेनॉलच्या दरात वाढ करणे तसेच इथेनॉल प्रकल्पांना प्रलंबित व्याज अनुदान तातडीने उपलब्ध करून देणे, या मागण्यांसाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

## संपादकीय....

### न्यायालयाचे ताशेरे

मुंढवा जमीन घोटाळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार पार्थ पवार यांना आरोपी का करण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने पोलीस महासंचालक आणि तपास अधिकाऱ्याला दिले आहेत. पोलीस महासंचालकांनी स्वतः याबाबतचे उत्तर प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणातील दोन आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी करताना न्या. माधव जामदार यांच्या एकल पीठाने बुधवारी हे आदेश दिले. मुंढवा येथील सुमारे ४० एकर जमीन अमेडिया कंपनीने बाजारभावापेक्षा कमी किमतीत खरेदी केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. या व्यवहाराच्या वेळी दिग्विजयसिंह पाटील आणि पार्थ पवार हे कंपनीचे संचालक होते. मात्र, प्रकरणात एकट्या पाटील यांनाच आरोपी करण्यात आले असून पार्थ पवार यांना आरोपी करण्यात आलेले नाही, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. पार्थ पवार हे प्रभावशाली व्यक्ती असून ते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र आहेत. त्यांच्या प्रभावामुळे त्यांना या प्रकरणात आरोपी करण्यात आले नसल्याचा दावा सुनावणीदरम्यान करण्यात आला. या मुद्द्याची न्यायालयाने दखल घेत तपास यंत्रणेकडून स्पष्टीकरण मागविले आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन आठवड्यांत या संदर्भातील उत्तराचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याची हमी देण्यात आली. त्याची नोंद घेत न्यायालयाने पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी ठेवली आहे. या प्रकरणातील सूर्यकांत येवले आणि कुंदन गायकवाड यांनी अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला आहे. या जमीन व्यवहारातील घोटाळ्यात आपला कोणताही सहभाग नसल्याचा दावा दोघांनी केला. मात्र, हे दोघेही कथित गैरव्यवहारात सक्रियपणे सहभागी असल्याचा युक्तिवाद राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने येवले आणि गायकवाड यांना अटकेपासून यापूर्वी मिळालेले संरक्षण पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवले आहे.

# महाराष्ट्राचा बळीराजा : पुजतो सर्जा-राजा!

(१० सप्टेंबर:पिठोरी अमावस्या-बैलपोळा विशेष.)



श्रावण महिन्यात सणांची रेलचेल पहायला मिळते. अनेक सण या महिन्यात आपल्या भेटीला येतात. पावसाचे दिवस असल्याने सृष्टी आधीच हिरवाईचा शालू नेसून नव्या नवरीवानी सजलेली असते. संपूर्ण वातावरणात एक प्रकारचा गारवा पसरल्याने मानवी मन देखील ताजे तवाने झालेले असते. अशा या श्रावण महिन्यात आपण नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी यांसारखे सण साजरे करतो आणि या श्रावण महिन्याची सांगता होते ती श्रावण महिन्याच्या अखेरीस येणाऱ्या पोळा या सणाने! तो बैलपोळा व तान्हापोळा असा दोन दिवसांचा असतो. पोळ्याची गाणी- झडत्यांमुळे सानाथोरांचे खुप मनोरंजन होते-

पोया रे पोया, बैलांचा पोया।
तुरीच्या दायीने, मारला हो डोया।।
कांद्याने आमचे, केले हो वांदे।
ऊसवाला बाप, ढसा ढसा रडे।।
एक नमन गौरा पार्बती; हर बोला, हर हर महादेव..!

श्रावण अमावस्येला अर्थात पिठोरी अमावस्येला शेतकरी बांधव आपल्या सर्जा-राजाचा हा सण अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतांना आपल्याला दिसतात. पुणे मुंबई यांसारखी मेट्रो शहरे या सणाविषयी कदाचीत अनभिज्ञ असावीत, एवढी ती वाढली आहेत. या शहरांची धावपळ पाहिली, की पोळा या सणाची यांना काही माहिती आहे की नाही, असे वाटते. परंतु या शहराच्या आसपासची गावे आणि संपूर्ण महाराष्ट्रात बळीराजा मात्र आपल्या जिवाभावाच्या सोबत्याचा हा सण अत्यंत पारंपारिक पध्दतीने आजही साजरा करतांना दिसतो. पोळा या सणाच्या आदल्या दिवशी बैलांना रितसर आमंत्रण देण्याची पध्दत आहे बरं का? शेतकरी प्रेमाने बैलांना म्हणतो, की आज आवतन घ्या; उद्या जेवायला या! वरून झडती हाक-

वाटी रे वाटी खोबऱ्याची वाटी।
महादेव रडे दोन पैश्यासाठी।।
पार्बतीच्या लुगड्याले छप्पन गाठी।
देव कवा धावल गरिबांसाठी?
एक नमन गौरा पर्बती; हर बोला, हर हर महादेव..!

असे आमंत्रण या बैलांना दिले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी बैलांना नदीवर नेले जाते, त्यांना झकास अंघोळ घालण्यात येते. घरी आणल्यावर त्यांच्या सर्वांगावर गेरूचे ठिपके दिले जातात. शिंगाना आरसे, चवारे, बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा घातल्या जातात. पायांमध्ये चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात. नवी वेसण नवा कासरा घातल्यानंतर अंगावर रेशमी नक्षीकाम केलेली झूल पांघरली जाते. कैलासातील महादेवाच्या नंदीलाही लाजवेल, अशी बैलजोडी शृंगारली जाते. जनावरांचा गोठा स्वच्छ करण्यात येतो. घरातील सुवासीनी बैलांची विधीवत पूजा करतात. बैलांकडून पोळ्याच्या दिवशी कोणतेही काम करून घेतले जात नाही. गोडधोड, पुरणपोळीचा घास त्यांना भरवला जातो. बैलांची कायम निगा राखणाऱ्या बलक्याला- गड्याला नवे कपडे दिले जातात.

बालपणी आपण त्यांच्या सजण्याचे वर्णन कवितेतून वाचत होतो-

शिंगे रंगविली, बाशिंगे बांधली!
चढविल्या झूली, ऐनेदार!!

बैलांचे जेवण झाल्यानंतर सायंकाळी त्यांना गावाबाहेर मंदिरात नेले जाते. सर्व शेतकरी आपापल्या जोड्या घेऊन असल्यास मारुतीच्या मंदिराजवळ किंवा एका ठिकाणी एकत्र येतात. आंब्याच्या पानांचे तोरण बांधून बैलांना रांगेत उभे करण्यात येते. ढोल, ताशे, नगारे आदी वाद्य वाजवले जातात. झडत्या-पोळ्याची गाणी म्हटली जातात. येथे बैलांच्या शर्यती देखील आयोजित केल्या जातात. ज्याच्या जोडीला सर्वात चांगले तयार केले वा सजवले असेल, त्या जोडीला पारितोषीक दिले जाते. आपापल्या गावातील परंपरेनुसार उत्सव साजरा झाल्यानंतर किंवा पोळा फुटल्यानंतर कार्यक्रम संपन्न होतो. घरी निघतांना बैलांना घरोघरी नेल्या जाते. तेथे आयाबाया बैलांची पूजा करतात. बैल नेणाऱ्यास बोजारा- पैसे देण्याची प्रथा रुढ आहे. हिंदू संस्कृतीत वृक्षांप्रमाणेच वन्यजिवांना देखील पुजनीय मानल्या जाते. झडती खुणावते-

पोळा रे पोळा, पाऊस झाला भोळा!
शेतकरी हीतासाठी, सगळे व्हा गोळा!
एक नमन गौरा पर्बती; हर बोला, हर हर महादेव..!!

वर्षभर शेतात शेतकऱ्यासमवेत बरोबरीने राबणाऱ्या बैलांप्रती एक दिवस उतराई होण्याची संधी म्हणून पोळा या सणाकडे आपण पाहातो. पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरांप्रमाणे हे उत्सव आजही गावागावांमधून उत्साहात साजरे होतांना आपल्याला दिसतात.

!! बैलपोळा सर्व शेतकरी बांधवांना सुख समृद्धीवर्धक ठरो!!

- एक शेतकरीपुत्र -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे.
रामनगर- गडचिरोली,
७७७५०४१०८६.

# एक संवाद, एक आधार; जीवनाला जगण्याची नवी आशा

दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. मानवी जीवनाचे अमूल्यत्व अधोरेखित करणारा आणि संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या पाठीशी संवेदनशीलतेने उभे राहण्याचा संदेश देणारा हा दिवस आहे. आत्महत्या हा केवळ एका व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित प्रश्न नाही; तो कुटुंब, समाज, आरोग्यव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि एकूणच मानवी नातेसंबंधांशी जोडलेला गंभीर सामाजिक व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील तीव्र मानसिक वेदना, एकाकीपणा, कौटुंबिक संघर्ष, आर्थिक अडचणी, शैक्षणिक किंवा व्यावसायिक ताण, नातेसंबंधांतील तणाव, सामाजिक अपमान, आजारपण किंवा भविष्याबद्दल निर्माण झालेली निराशा अशा अनेक कारणांचा एकत्रित परिणाम तिच्या मानसिक अवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्येकडे केवळ कमजोरी, भ्याडपणा किंवा चुकीचा निर्णय म्हणून पाहणे हा समस्येचा अतिशय संकुचित दृष्टिकोन ठरतो. या समस्येकडे मानवी वेदना, मानसिक आरोग्य आणि सामाजिक परिस्थिती या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक आहे.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची सुरुवात २००३ मध्ये इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सुसाइड प्रिव्हेन्शन आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने झाली. आत्महत्या रोखण्यासाठी जागतिक स्तरावर जागरूकता निर्माण करणे, या विषयाभोवती असलेला सामाजिक कलंक कमी करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांना व्यापक स्वरूप देणे हा या दिवसाचा मुख्य हेतू आहे. २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी 'आत्महत्येविषयीचा दृष्टिकोन बदलूया' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली असून, २०२६ हे या त्रैवार्षिक अभियानाचे अंतिम वर्ष आहे. या अभियानाचा मूलभूत संदेश असा आहे की आत्महत्येविषयी मौन आणि गैरसमज यांना दूर करून खुलेपणाने, संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने संवाद साधला पाहिजे. संकटातील व्यक्तीला ऐकून घेणे, तिच्या भावनांचा आदर करणे, तिच्यावर दोषारोप न करणे आणि योग्य वेळी मदतीशी जोडणे हा प्रतिबंधाचा महत्त्वाचा मार्ग आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगभरात दरवर्षी सात लाखांहून अधिक लोक आत्महत्येमुळे मृत्युमुखी पडतात. ही संख्या केवळ आकडेवारी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक संख्येमागे एक व्यक्ती, एक कुटुंब, अनेक नाती आणि अनेक अपूर्ण स्वप्ने असतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचा परिणाम तिच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; पालक, मुले, भाऊ-बहीण, मित्र, सहकारी आणि संपूर्ण समुदायावर त्याची भावनिक छाया पडते. म्हणून आत्महत्या प्रतिबंधाकडे केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्याच्या दृष्टीने पाहण्याऐवजी संकट निर्माण होण्यापूर्वीच व्यक्तीला आधार मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. मानसिक आरोग्यसेवा सुलभ करणे, सामाजिक एकाकीपणा कमी करणे, कुटुंबातील संवाद वाढविणे आणि संकटातील व्यक्तीला मदत मागण्यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रतिबंधाची मूलभूत पावले आहेत.

मानसिक आरोग्याबाबत आपल्या समाजातील दृष्टिकोन बदलण्याची आज सर्वाधिक गरज आहे. शरीराला आजार झाला तर आपण डॉक्टरांकडे जातो, औषधोपचार घेतो आणि विश्रांती घेतो; परंतु मनावर ताण आला, नैराश्य जाणवले किंवा सतत अस्वस्थता निर्माण झाली तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसून येते. हे मनाचेच आहे, थोडे सकारात्मक विचार कर, स्वतःला सावर किंवा तुझ्याकडे तर सर्व काही आहे अशा वाक्यांनी मानसिक वेदना दूर होत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची संकटे वेगळी असतात आणि त्यांचा तिच्यावर होणारा परिणामही वेगळा असतो. म्हणून दुसऱ्याच्या दुःखाची तुलना आपल्या अनुभवांशी करणे टाळले पाहिजे. मानसिक त्रास हा व्यक्तीच्या चारित्र्याचा दोष नसून आरोग्याशी संबंधित एक गंभीर बाब आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे.

आत्महत्या प्रतिबंधाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे संवाद. अनेकदा एखादी व्यक्ती संकटात असताना थेट मदत मागत नाही. तिच्या वर्तनात बदल होऊ शकतो, ती अधिक एकाकी राहू शकते, सतत निराश किंवा अस्वस्थ दिसू शकते किंवा पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींपासून दूर जाऊ शकते. अशा वेळी काय झाले? एवढे विचारून थांबण्याऐवजी तुला काही त्रास होत आहे का?, तुला माझ्याशी बोलायचे असेल तर मी ऐकण्यासाठी आहे असा विश्वास देणे आवश्यक आहे. संवाद साधताना समोरच्या व्यक्तीचे बोलणे मध्येच तोडणे, दोष देणे किंवा लगेच उपदेश करणे टाळले पाहिजे. काही वेळा व्यक्तीला उपायापेक्षा प्रथम कोणीतरी आपले म्हणणे मनापासून ऐकावे अशी गरज असते. ऐकून घेणे ही साधी कृती असली तरी तिचे भावनिक महत्त्व मोठे असते.

कुटुंबाच्या भूमिकेला या संदर्भात विशेष महत्त्व आहे. कुटुंब व्यक्तीला भावनिक सुरक्षितता देणारे पहिले वर्तुळ असते. मात्र आधुनिक जीवनशैली, कामाचा वाढता ताण, स्थलांतर, डिजिटल माध्यमांचा अतिरेक आणि बदलती कौटुंबिक रचना यामुळे घरात राहूनही भावनिक अंतर वाढताना दिसते. एकाच घरात राहणारे सदस्य एकमेकांशी बोलण्यासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. पालकांना मुलांच्या अभ्यासाची, नोकरीची आणि भवितव्याची चिंता असते; पण मुलांच्या मनातील भीती, असुरक्षितता, अपयशाची भावना किंवा भावनिक संघर्ष समजून घेण्यासाठी आवश्यक संवाद कमी पडतो. मुलांच्या यशापेक्षा त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तुला नेहमी पहिलाच क्रमांक मिळाला पाहिजे यापेक्षा काहीही झाले तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत हा संदेश त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो.

विद्यार्थी आणि तरुण हे विशेष संवेदनशील वयोगट आहेत. शिक्षणातील तीव्र स्पर्धा, परीक्षेतील अपेक्षा, प्रवेशाच्या संधी, करिअरची अनिश्चितता, बेरोजगारी, पालकांचा दबाव, मैत्री किंवा प्रेमसंबंधांतील तणाव आणि सामाजिक माध्यमांवरील तुलना यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा अनुभव घेतात. आज यशाची व्याख्या अनेकदा गुण, पद, पगार आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडली जाते. त्यामुळे अपयश आले की काही तरुणांना स्वतःचे मूल्य कमी झाल्यासारखे वाटू शकते. शिक्षणव्यवस्थेने ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अपयश हा जीवनाचा एक अनुभव आहे, अंतिम निर्णय नाही, हे समजावून सांगितले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशन, भावनिक शिक्षण, जीवनकौशल्ये आणि तणाव व्यवस्थापन यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

सामाजिक माध्यमांच्या युगात मानसिक आरोग्याचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. इतरांच्या जीवनातील यश, आनंद, प्रवास, आर्थिक संपन्नता आणि सामाजिक प्रतिष्ठेची चित्रे सतत पाहताना व्यक्ती नकळत स्वतःची तुलना इतरांशी करू शकते. मात्र सामाजिक माध्यमांवर दिसणारे जीवन हे संपूर्ण वास्तव नसते. प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतात, अपयश असते, चिंता असते आणि काही न सांगितलेल्या वेदनाही असतात. त्यामुळे आभासी जगातील प्रतिमांशी आपल्या वास्तवाची तुलना करणे टाळले पाहिजे. डिजिटल साधनांचा विवेकी वापर, प्रत्यक्ष नात्यांना दिलेला वेळ आणि स्वतःच्या भावनांकडे लक्ष देण्याची सवय मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधाचा प्रश्न तरुणांपुरताच मर्यादित नाही. आर्थिक संकटात सापडलेले कुटुंब, बेरोजगार युवक, व्यवसायात नुकसान झालेल्या व्यक्ती, शेतकरी आणि कामगार, गंभीर आजाराशी सामना करणारे नागरिक, कौटुंबिक हिंसाचार किंवा सामाजिक भेदभावाचा अनुभव घेणारे लोक आणि एकाकीपणाने त्रस्त वृद्ध या सर्व घटकांच्या मानसिक आरोग्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विशेषतः आर्थिक संकटाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम गंभीर असू शकतो. पैसा कमी पडणे ही केवळ आर्थिक समस्या राहत नाही; त्यासोबत कुटुंबाची जबाबदारी, सामाजिक प्रतिष्ठा, भविष्याची चिंता आणि असुरक्षितता जोडली जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिला सामाजिक, आर्थिक आणि भावनिक आधार देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याचे आव्हान मोठे आहे. अनेक ठिकाणी मानसिक त्रासाला आजार न मानता स्वभावाचा दोष मानला जातो. मानसिक आरोग्यतज्ज्ञांकडे जाणे म्हणजे समाजात आपली प्रतिमा खराब होईल, अशी भीती काही व्यक्तींना वाटू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्यसेवा गावपातळीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक जनजागृती केली पाहिजे. मानसिक आरोग्य हा केवळ मोठ्या शहरातील विषय नसून ग्रामीण समाजाचाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. आत्महत्या प्रतिबंधात माध्यमांची जबाबदारी अत्यंत मोठी आहे. एखाद्या आत्महत्येच्या घटनेचे वृत्तांकन करताना सनसनाटी मथळे, अनावश्यक तपशील, व्यक्तीला दोष देणारी भाषा किंवा घटनेचे उदात्तीकरण टाळले पाहिजे. संवेदनशील वृत्तांकन समाजाला प्रतिबंधात्मक माहिती देऊ शकते. बातमीसोबत मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन, मदत मिळण्याची साधने आणि गरजूंनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असा संदेश दिल्यास माध्यमे समाजाच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका बजावू शकतात. वृत्तपत्रे आणि माध्यमे केवळ घटना सांगणारी साधने नसून सामाजिक विचार घडविणारी प्रभावी माध्यमे आहेत. त्यामुळे या विषयाकडे मानवी संवेदना आणि सामाजिक जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. शासन आणि आरोग्यव्यवस्थेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मानसिक आरोग्याच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि सन्मानपूर्वक उपलब्ध झाल्या पाहिजेत. मानसिक आरोग्यतज्ज्ञांची उपलब्धता वाढविणे, प्राथमिक आरोग्यव्यवस्थेशी मानसिक आरोग्यसेवा जोडणे, शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि संकटातील व्यक्तींना योग्य मदत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका ओळखली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती मानसिक आरोग्यतज्ज्ञ असणे आवश्यक नाही; परंतु प्रत्येकजण संवेदनशील माणूस होऊ शकतो. आपल्या मित्राच्या वर्तनात अचानक बदल जाणवला तर त्याच्याशी संवाद साधता येतो. एखादा सहकारी सतत तणावाखाली दिसत असेल तर त्याची विचारपूस करता येते. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती एकाकी होत असेल तर तिच्यासोबत वेळ घालवता येतो. विद्यार्थी चिंताग्रस्त दिसत असेल तर त्याच्यावर केवळ अभ्यासाचे दडपण न आणता त्याच्या मनाची अवस्था जाणून घेता येते. संकटातील व्यक्तीला तिच्या समस्यांचे सर्व उत्तर आपल्याकडे नसले तरी योग्य मदत मिळवून देण्यासाठी आपण दुवा बनू शकतो. हीच सामाजिक संवेदनशीलतेची खरी परीक्षा आहे. समाजात मदत मागणे म्हणजे कमजोरी हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीत मदत मागण्याचे धैर्य हे कमजोरीचे नव्हे, तर आत्मजाणीवेचे लक्षण आहे. आपल्या मनावरचा ताण ओळखणे, तो विश्वासू व्यक्तीसमोर व्यक्त करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ मदत घेणे ही आरोग्यदायी कृती आहे. मानसिक आरोग्याविषयी बोलताना लाज वाटू नये. जसे ताप आला की आपण उपचार घेतो, तसे मन अस्वस्थ झाल्यावरही मदत घेणे स्वाभाविक मानले पाहिजे. समाजाने मानसिक आरोग्याची चर्चा सामान्य केली तर अनेक व्यक्तींना योग्य वेळी मदत मिळण्याची शक्यता वाढेल. आत्महत्या प्रतिबंधाचा व्यापक अर्थ संकटाच्या अंतिम टप्प्यावर हस्तक्षेप करणे एवढाच नाही. जीवनात अर्थपूर्ण नाती निर्माण करणे, व्यक्तीला सामाजिक स्वीकार मिळवून देणे, भेदभाव कमी करणे, रोजगार आणि सामाजिक सुरक्षिततेच्या संधी वाढविणे, शिक्षणात मानवी मूल्यांना स्थान देणे आणि आरोग्यसेवा सर्वांसाठी सुलभ करणे हा त्याचा मोठा भाग आहे. मानसिक आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा जवळचा संबंध आहे. ज्या समाजात व्यक्तीला आपले दुःख व्यक्त करण्याची मोकळीक असते, अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याची संधी मिळते आणि संकटात मदतीचा हात पुढे होतो, तो समाज मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम असतो.

१० सप्टेंबरचा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आपल्याला म्हणूनच एक महत्त्वाचा सामाजिक संदेश देतो. संकटातील व्यक्तीला तिच्या परिस्थितीसाठी दोष देऊ नका; तिचे म्हणणे ऐका. तिच्या वेदनेची तुलना इतरांच्या वेदनांशी करू नका; तिच्या अनुभवाचा आदर करा. ती मदत मागत असेल तर तिला दुर्लक्षित करू नका; योग्य मदतीपर्यंत पोहोचवा. तिच्या आयुष्यातील एका कठीण प्रसंगाला तिच्या संपूर्ण जीवनाचे अंतिम सत्य मानू नका. परिस्थिती बदलू शकते, योग्य मदत मिळू शकते आणि जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणून संकटातील व्यक्तीला वेळ, आधार, उपचार आणि आशा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या दिवशी आपण आपल्या घरापासून सुरुवात करूया. मुलांशी फक्त त्यांच्या गुणांबद्दल बोलू नका; त्यांच्या भावनांबद्दलही विचारा. तरुणांच्या अडचणींना हट्ट किंवा अपरिपक्वता म्हणून नाकारू नका. वृद्धांच्या शांततेमागे एकाकीपणा आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. मित्राच्या हसऱ्या चेहऱ्यामागे काही वेदना आहेत का, याची विचारपूस करा. कार्यस्थळी सहकाऱ्यांशी मानवी नात्याने वागा. मानसिक आरोग्याविषयी चर्चा करण्यास सुरक्षित वातावरण निर्माण करा. कारण आत्महत्या प्रतिबंधाची सुरुवात कोणत्याही मोठ्या योजनेतून नव्हे, तर आपल्या दैनंदिन वर्तनातील संवेदनशील बदलातून होते. मानवी जीवन हे कोणत्याही एका परीक्षेच्या निकालापेक्षा, कोणत्याही एका नात्यापेक्षा, कोणत्याही एका आर्थिक संकटापेक्षा किंवा कोणत्याही एका अपयशापेक्षा मोठे आहे. आयुष्याच्या वाटेवर संकटे येतात, परंतु संकट म्हणजे जीवनाचा शेवट नव्हे. माणसाला पुन्हा उभे राहण्यासाठी कधी कधी केवळ एक विश्वासू व्यक्ती, काही क्षणांचा मनापासून संवाद आणि योग्य मदतीचा मार्ग आवश्यक असतो. म्हणून समाजाने अशी संस्कृती निर्माण केली पाहिजे की जिथे प्रत्येक व्यक्तीला माझे दुःख कोणीतरी ऐकेल, माझ्या अडचणीची थट्टा केली जाणार नाही आणि गरज पडल्यास मला मदत मिळेल असा विश्वास वाटेल.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन हा केवळ एका दिवसाचा उपक्रम ठरू नये. मानसिक आरोग्याविषयीचा संवाद वर्षभर सुरू राहिला पाहिजे. शाळा, महाविद्यालये, कुटुंबे, कार्यस्थळे, आरोग्यसंस्था, माध्यमे आणि समाजसंस्था यांनी एकत्रितपणे संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला सन्मान मिळाला पाहिजे. दुःख व्यक्त करण्याला कमजोरी समजले जाऊ नये आणि मदत मागण्याला लाजेची बाब मानले जाऊ नये. समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप केवळ आर्थिक विकासात नसून संकटात असलेल्या आपल्या माणसांच्या पाठीशी आपण किती ठामपणे उभे राहतो यात आहे. आजच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आपण एक सामूहिक संकल्प करूया, मौनाऐवजी संवादाची निवड करूया, उपेक्षेऐवजी आपुलकीची निवड करूया, दोषारोपाऐवजी समजूतदारपणाची निवड करूया आणि निराशेऐवजी आशेचा संदेश देऊया. आपल्या आसपासच्या व्यक्तीच्या मनातील वेदना आपण पूर्णपणे समजू शकूच असे नाही; परंतु ती वेदना ऐकण्याची तयारी आपण नक्की दाखवू शकतो. प्रत्येक संकटग्रस्त व्यक्तीला योग्य वेळी योग्य आधार मिळावा यासाठी आपण दुवा बनू शकतो. एका प्रश्नातून संवाद सुरू होऊ शकतो, संवादातून विश्वास निर्माण होऊ शकतो, विश्वासातून मदतीचा मार्ग खुला होऊ शकतो आणि त्या मदतीतून जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणूनच आजचा संदेश स्पष्ट आहे की एक संवाद साधूया, एक आधार देऊया, मौनाची भिंत तोडूया आणि प्रत्येक जीवनाला जगण्याची नवी आशा देऊया; कारण प्रत्येक जीवन अमूल्य आहे आणि प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सीना-माढा योजनेच्या नूतनीकरणाला हिरवा कंदील; आ. अभिजीत पाटील यांचे पाठपुराव्याला यश

## २१ वर्षे जुन्या यंत्रणेच्या दुरुस्ती-नूतनीकरणाला नियामक मंडळाची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेतील तब्बल २१ वर्षे जुनी यंत्रणा बदलण्यासह सर्व मोटारी बदलण्यात येणार असून सुमारे ६ किलोमीटर लांबीची मेन रायझिंग पाइपलाइ-नही नव्याने टाकण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून अपुऱ्या व अनियमित पाण्यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याने माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांचे सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

आज मुंबई येथे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियामक मंडळाच्या महत्त्वपूर्ण बैठकीस माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील उपस्थित होते. या



बैठकीत सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाबाबत सविस्तर चर्चा होऊन जुन्या यंत्रणेच्या पुनर्बांधणीस मंजुरी देण्यात आली.

सीना-माढा उपसा सिंचन योजना गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरत आली आहे. मात्र, योजनेतील यंत्रणा जुनी झाल्याने मोटारी, पंपिंग व्यवस्था आणि पाइपलाइनच्या क्षमतेवर परिणाम होत होता. परिणामी अपेक्षित क्षमतेने पाणी उपसा करून ते शेतीपर्यंत पोहोचव-ताना अडचणी निर्माण होत होत्या.

या पार्श्वभूमीवर सर्व मोटारी बदलणे, पंपिंग यंत्रणा सक्षम करणे आणि सुमारे ६ किलोमीटरची मेन रायझिंग पाइपलाइन नव्याने उभारणे, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या यंत्रणेचे नूतनीकरण झाल्यानंतर योजनेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांना अधिक प्रभावीपणे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सीना-माढा सिंचन योजनेच्या प्रश्नासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी गेल्या काही काळापासून सातत्याने पाठपुरावा केला होता. योजनेची सद्यस्थिती, जुन्या मोटारी व पाइपलाइनमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते.

शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळण्यासाठी योजनेची यंत्रणा सक्षम होणे अत्यावश्यक असल्याची भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत नियामक मंडळाने दुरुस्ती व नूतनीकरणाच्या कामाला मंजुरी दिली आहे. सीना-माढा योजनेतील मोटारी व मुख्य पाइ-पलाइन बदलण्याच्या निर्णयामुळे माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आ-



हेत. योजनेची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्यास अनेक गावांतील शेतीला त्याचा थेट फायदा होऊ शकतो. त्यामुळे मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळणार आणि सुधारित यंत्रणेतून शेतकऱ्यांना नियमित पाणी कधी मिळणार, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

सीना-माढा योजनेतील मोटारी व मुख्य पाइपलाइन बदलण्याच्या निर्णयामुळे माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. योजनेची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्यास अनेक गावांतील शेतीला त्याचा थेट फायदा होऊ शकतो. त्यामुळे मंजुरीनंतर आता प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळणार आणि सुधारित यंत्रणेतून शेतकऱ्यांना नियमित पाणी कधी मिळणार, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे. या निर्णयासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, श्री. हेमंतजी धुमाळ, श्री. चोपडे, श्री. एस.सी. खांडेकर तसेच या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणारे अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

**पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात मिळाले की शेती फुलते आणि शेती फुलली की माढ्याचा विकास अधिक वेगाने होईल त्यामुळे सीना-माढा योजनेच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचा हा निर्णय केवळ यंत्रणा बदलण्यापुरता मर्यादित नसून माढ्यातील शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. माढ्याच्या मातीतील प्रत्येक शेतकरी सुखी आणि समृद्ध व्हावा, हीच आपली मनापासूनची इच्छा असून शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठीचा लढा यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व सर्व अधिकाऱ्यांचे आभार.**

**– आ. अभिजीत आबा पाटील**
**माढा विधानसभा मतदारसंघ**

# गणेश भक्तांना मनसेकडून मोफत गणेश मूर्ती वाटपाचे दिलीप धोत्रे यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्तुत्य उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गणेशोत्सव काही दिवसावर काऊन ठेपला असतानाच, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने प्रभाग १७ मधील गणेश भक्तांसाठी मोफत गणेश मूर्ती वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. म्हणजे हे नेते दिलीप बापट होते यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात येत असून नगरसेविका माधवीताई धोत्रे यांच्या लेकेरी गल्ली येथील संपर्क कार्यालयाने गणेश मूर्तीचे वाटप केले जाणार आहे.

गणेशोत्सवात हा सर्वसामान्य च्या श्रद्धेचा आणि आनंदाचा उत्सव आहे प्रत्येक कुटुंबाला भक्तिभावाने गणरायाची प्रतिष्ठापना करता यावी, तसेच गणेशोत्सवाचा आनंद सर्वांनी घेता यावा या उद्देशाने मोफत गणेश मूर्ती वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे आयोजनाकडून सांगण्यात आले आहे.

तिच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक १७ मध्ये सामाजिक बांधिलकी जपत विविध सण उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंती महोत्सवाच्या आयोजन करण्यात येते याच सामाजिक कामाच्या मालिकेत गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांसाठी मोफत गणेश मूर्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उपक्रमातून नागरिकाशी असलेली आपुलकीचे नाते अधिक दृढ करण्यात बरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे प्रभागातील गणेश भक्तांना या उपक्रमाचा लाभ होणार असल्याने नागरिकाकडून मनसेच्या उपक्रमाचे स्वागत होत आहे. भक्ती भवानी व सामाजिक कार्याने, आनंदाने एकोप्याने, साजरा करावा असे आव्हान आयोजकाच्या वतीने करण्यात येत आहे.

# गोकुळ अष्टमी उत्सवानिमित्त श्री विठ्ठलास पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोकुळ अष्टमी उत्सवानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठलास आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकारांनी अलंकृत करण्यात आले. पारंपरिक अलंकारांनी सजलेले श्री विठ्ठलाचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शनासाठी मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

गोकुळ अष्टमी उत्सवा निमित्त श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड मोठा, हिऱ्याची कंगनजोड, शिरपेच लहान दहा लोक असलेला, मोत्याचा तुरा, नाम निळाचा, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरी,बाजीराव कंठी तोडे जोड, मोहरांची माळ, तुळशीची माळ एक पदरी, इमिटेशन नेकलेस, मस्त्य जोड आदी पारंपरिक व मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले.

गोकुळ अष्टमीच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठलाचे हे मनो-हारी रूप भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले असून, भाविकांनी भक्तिभावाने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले.

याबाबतची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# जुनी पेन्शनचा प्रश्न सोडवा, अन्यथा पुन्हा आझाद मैदानावर येऊ,: मा. शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांचा सरकारला इशारा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जुनी पेन्शनचा प्रश्न सोडवा अन्यथा पुन्हा आझाद मैदानावर येऊ माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांचा सरकारला इशारा एक नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी जुनी पेन्शन समन्वय संघाच्या वतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने सोलापूर येथे भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले व या मोर्चाला जिल्ह्यातील हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकुटुंब सहभागी झाले होते.

जुनी पेन्शन योजनेचा प्रश्न तात्काळ सोडवा अन्यथा पुन्हा आम्ही हजारोच्या संख्येने मुंबईतील आझाद मैदानावर येऊ असा इशारा माझी शिक्षक आमदार सावंत यांनी सरकारला दिला आहे.

जल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या या मूक मोर्चा मध्ये शिक्षकांनी हातात विविध मागणीचे फलक घेऊन शासनाचे लक्ष वेधले एक नोव्हेंबर २००५ पूर्वी सेवा सुरू केलेल्या अनेक शिक्षकांना सुरुवातीला अंशतः अनुदानित अथवा विनाअनुदानित तत्त्वावर सेवा बया बजावायची लागली त्यानंतर शासनाच्या अनुदानित धोरणानुसार त्यांना अनुदानित प्राप्त झाले मात्र पेशंटच्या बाबतीत त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

एक नोव्हेंबर २००५ पूर्वीची मग पेन्शन ची तारीख वेगळी का असा सवाल उपस्थित करत शिक्षकांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी केली अनेक वर्ष शैक्षणिक क्षेत्रात सेवा बजावूनही निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शक्षक दिनाच्या दिवशीच शिक्षकांना त्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. मूक मोर्चाच्या माध्यमातून शासनावर शांततापूर्ण पद्धतीने आपली मागणी पोहोचवण्यात आली.

मोहिमेनंतर जिल्हा परिषद कार्यालयातील पुनम गेट येथे एकत्रित जमा होऊन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले एक नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून आमदार समाधान आवताडे यांच्या मागणीची दखल

# शेतकऱ्यांच्या विजबाबतच्या विविध प्रश्नांना आमदार आवताडे यांनी फोडली वाचा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील शेतकरी व नागरिकांच्या विविध वीजविषयक प्रश्नांवर आमदार समाधान आवताडे यांनी आक्रमक भूमिका घेतली. पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संपर्क साधून त्यांनी मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न मांडत संबंधित अधिकाऱ्यांकडून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला महावितरणचे वरिष्ठ अधिकारी तसेच विभागीय अधिकारी उप-स्थित होते. यावेळी ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या समस्यांकडे आमदार आवताडे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांना गावठाणाप्रमाणे वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, नवीन डीपी बसविताना त्याची योग्य प्रकारे तपासणी करूनच कार्यान्वित करावा, अशी सूचना केली. फिल्टर युनिटवरून डीपी बसविल्यानंतर त्याला लागू असलेल्या एक वर्षाच्या वारंटी कालावधीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

एनएससी योजनेअंतर्गत घर-गुती तसेच व्यावसायिक ग्राहकांना वीज जोडणी उपलब्ध करून देताना शेतकरी व नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांना आवश्यक सेवा विनाशुल्क उप-लब्ध करून द्याव्यात, अशी भूमिका आमदार आवताडे यांनी मांडली.

सध्या शेतीपंपांसाठी अपुरा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. पिकांना वेळेवर पाणी देण्यासाठी शेतीपंपांना दररोज आठ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

आमदार आवताडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे मतदारसंघातील वीजपुरवठ्याशी संबंधित मूलभूत प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा निर्माण झाली असून शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# धम्म विनय बुद्धिस्ट मॉनेस्ट्री येथे भारतीय बौद्ध महासभेचा वर्षावास समारोप होणार : भंडारे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

बौद्ध धम्मातील कार्यकर्ते आणि पुजनिय भन्ते तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण साठी १८ कोटी खर्च करून आगळंबे, पुणे येथे सांचीच्या धर्तीवर धम्म विनय बुद्धिस्ट मॉनेस्ट्री निर्माण केलेली असून आता स्पर्धा परीक्षा साठी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केंद्र ही सुमारे ४२ कोटीचे बांधण्यात येत असल्याची माहिती ट्रस्टचे प्रमुख विलास वंशिव यांनी , दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौध्द महासभाचे ट्रस्टी, राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रीय कार्यालय प्रमुख ड डॉ एस के भंडारे यांनी कार्यकर्त्यांसह दिनांक ३ / ९ / २०२६ रोजी भेट दिली असता सांगितली. मॅनेस्ट्री पहिल्यानंतर एस के भंडारे यांनी विलास वंशिव आणि त्यांचे सर्व ट्रस्टी यांचे अभिनंदन केले.

डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या उपस्थितीत भारतीय बौद्ध महासभेच्या पुणे जिल्ह्यातील सर्व शाखांच्या वर्षावासाचा समारोप केला जाईल असे ही सांगण्यात आले या भेटीसाठी भारतीय बौद्ध महासभेचे राजरत्न थोरात पुणे महानगर अध्यक्ष व राज्य सचिव विजय ओव्हाळ राज्य संघटक राधाकांत कांबळे पिंपरी चिंचवड अध्यक्ष डी व्ही सुरवसे(पिंपरी चिं-चवड सरचिटणीस तुळशीराम पडघन शाखा कोषाध्यक्ष इत्यादी पदाधिकारी सहभागी झाले होते.

## विनय बुध्दिस्ट मॉनेस्ट्री हे स्पर्धा परीक्षाचे मार्गदर्शन केंद्र होणार

सकाळी धायरी येथील कमल बबन कांबळे यांनी त्यांचे जेतवन बुद्ध विहार हे डॉ भीमराव आंबेडकर भारतीय बौद्ध महासभा यांना दान करणार असल्याने प्रत्यक्ष भेट देऊन त्याची पहाणी केली संध्यकाळी ट्रस्टी चेअरमन ॲड सुभाष जोंजाळे यांच्याशी बैठक झाली तसेच पुणे पश्चिम जिल्हा अध्यक्ष प्रकाश व्होवाळ यांच्या नेरे येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केल. दिनांक ४ / ९ / २०२६ रोजी सकाळी भारतीय बौध्द महासभा पुणे महानगर शाखेच्या बुक स्टॉल येथे कार्यकर्त्यांशी चर्चा झाली आणि त्यानंतर सेवानिवृत्त/ गृहिणी यांना उत्पन्नाच्या संधीसाठी सौरभ हॉल येथे मार्गर्शन केले आणि त्यानंतर म्हाडा प्रशिक्षण केंद्र येथे म्हाडा कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# पंढरपूर तहसील कार्यालयावर ऊस दर संघर्ष समितीचे 'बोंबाबोंब आंदोलन'

## शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रशासनाला घेरले; आत्मदहनाच्या प्रयत्नाने आंदोलनस्थळी काहीकाळ तणाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रलंबित बिल, शेतीपंपांचा वीजपुरवठा, बिबट्याचा बंदोबस्त, ऊसावरील पायरीला रोग, खते व कृषी औषधांच्या वाढत्या किमती तसेच विजेच्या दुर्घटनांमध्ये मृत्यू झालेल्या शेतकरी कुटुंबांना मदत यांसह विविध मागण्यांसाठी ऊस दर संघर्ष समितीच्या वतीने पंढरपूर तहसील कार्यालयावर 'बोंबाबोंब आंदोलन' करण्यात आले.



आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहावे, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

**'पिके जळाली तर जबाबदारी कोणाची?' – सचिन पाटील**

आंदोलनाला संबोधित करताना शेतकरी नेते सचिन पाटील यांनी शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद करण्याच्या निर्णयावर तीव्र संताप व्यक्त केला.

शेतीपंपाची लाईट बंद केल्यामुळे जर शेतकऱ्यांची पिके जळाली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी जिल्ह्याचे पालक म्हणून शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि जीवाचे रक्षण करण्याची जबाबदारी घ्यावी. शेतकऱ्यांसाठी पाणी आणि विजेचे नियोजन करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे, अशी टीका सचिन पाटील यांनी केली.

त्यांनी पुढे शेतकऱ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. पिके वाचवण्यासाठी तातडीने शेतीपंपांचा वीजपुरवठा सुरळीत करा, अशी मागणी केली.

**ऊसाच्या पोळ्याच्या बिलासाठी शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न**

दरम्यान, चंद्रकांत बागल नामक शेतकऱ्याने ऊसाच्या पोळ्याच्या बिलाच्या मागणीसाठी अंगावर पेट्रोल आतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेमुळे आंदोलनस्थळी काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळत नसल्याने निर्माण झालेली ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून शासनाने याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

**तहसीलदारांनी अधिकाऱ्यांना आंदोलनस्थळी बोलावले**

दरम्यान, पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोट, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड आणि पन्हाळकर यांनी आंदोलनाची दखल घेतली. त्यांनी महावितरण (चडएऊउड), वन विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना आंदोलनस्थळी बोलावून घेतले आणि आंदोलकांच्या विविध मागण्यांवर चर्चा केली.

शेतीपंपांचा वीजपुरवठा, गादेगाव परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त, ऊसावरील पायरीला रोगाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना आणि इतर मागण्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली.

**या आहेत प्रमुख मागण्या**

– पोळा सणासाठी परंपरेप्रमाणे ऊस बिलाचा दुसरा हप्ता तातडीने द्यावा.

– शेतीपंपांचा अचानक कपात केलेला वीजपुरवठा सुरळीत करावा.

– वीजअभावी पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी.

– गादेगाव परिसरातील बिबट्याला तातडीने पकडून सुरक्षित अधिवासात सोडावे.

– ऊसावरील पायरीला रोगाच्या नियंत्रणासाठी साखर कारखान्यांनी माफक दरात ड्रोन उपलब्ध करून द्यावेत.

– खते व कृषी औषधांच्या वाढत्या किमतींवर शासनाने नियंत्रण आणावे.

– शेतात विजेचा करंट लागून मृत्यू झालेल्या शेंडगे व नागणे कुटुंबांना तत्काळ शासकीय मदत द्यावी.

**मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता ठोस निर्णय आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी भूमिका ऊस दर संघर्ष समितीने घेतली आहे.

आज शेतकरी आपल्या हक्कासाठी तहसील कार्यालयावर आवाज उठवत आहे. उद्या हा आवाज जिल्हाभर पोहोचेल. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलनाची पुढील दिशा अधिक तीव्र असेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

**– ऊस दर संघर्ष समिती, पंढरपूर**

यावेळी ऊस बिलासाठी शेतकरी दिपक भोसले, समाधान फाटे, तानाजी बागल, सचिन पाटील, नितीन बागल, माऊली जवळेकर, निवास नागणे, रायाप्पा हळणवर, शेखर आटकळे, शहाजन शेख, चंद्रकांत बागल, राहूल पवार, बाळासाहेब जगदाळे, गणेश लामकाने, शहाजी जगदाळे, रामदास घाडगे, शेखर आटकळे, प्रकाश गाजरे, अनिल बागल, मधुकर बागल, दशरथ जवळेकर, विनोद बागल, दिपक पाटील, रमेश नागणे, भिमराव नागणे, विक्रांत जगदाळे, ऋषीकेश नागणे, वैभव नागणे, अनिल नागणे आदी उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील स्नेहा गायकवाड हिचे जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी स्नेहा गायकवाड हिने दयानंद कॉमर्स कॉलेज सोलापूर येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

दयानंद कॉमर्स कॉलेज यांच्या वतीने जिल्हास्तरीय आयोजित करण्यात आलेल्या इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील ५७ विद्यार्थी सहभागी झाले होते.



कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कुमारी स्नेहा गायकवाड बीएससी भाग १ मुस्कान शेख व सपना चेंडके बीए भाग १ यांनी या वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदविला होता, पैकी स्नेहा गायकवाड, राहणार कोन्हाळी या विद्यार्थिनींनी स्पर्धेमध्ये नैपुण्य दाखवून क्रमांक पटकावला तिला इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक प्राचार्य डॉ शिवाजीराव शिंदे यांनी तिच्या वाक् चातुर्य विषयी विशेष कौतुक केले.

या यशाबद्दल संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी ताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, समन्वयक पूनम कोकळगी, रुपाली शहा, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

### कु. स्नेहा गायकवाड हिचे यश कौतुकास्पद

**ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासोबतच सांस्कृतिक व बौद्धिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे ही महाविद्यालयीन व्यवस्थापनाची जबाबदारी असते या भूमिकेतूनच इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेतील स्नेहा गायकवाड हिने संपादन केलेले यश कौतुकास्पद आहे असे मत शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

# सामाजिक संस्थांनी वृक्ष संवर्धन मोहीम राबवावी : रूपाली शहा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : वृक्षामुळे प्राणवायू, सावली, फळे, औषधे आणि अनेक जीवांना निवारा मिळतो. त्यामुळे वृक्षतोड थांबून झाडाचे रक्षण करण्यासाठी सामाजिक संस्थांनी वृक्ष संवर्धनाची मोहिमा राबवावी असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या रूपाली शहा यांनी केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुल व सोलापूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पंधरवडा निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, समता दूत सौ नालंदा चंदनशिवे, प्रकल्प अधिकारी सौ प्रणिता कांबळे, पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

पुढे त्या म्हणाल्या की, झाडांची योग्य निगा राखण्यासाठी कुंपण घालणे, नियमित पाणी देणे, खत घालणे, छाटणी करणे आधी प्रकल्प राबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत

प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे म्हणाल्या कीझाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्येकाने आचरणात आणल्यास भविष्यात हिरवेगार आणि निरोगी पर्यावरण निर्माण होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ नालंदा चंदनशिवे यांनी केले आभार राजेंद्र गवळी यांनी मानले कार्यक्रमास प्रा सौरभ भस्मे प्रा भीम सोनकांबळे, मुख्याध्यापक सुरेश आवटे, बाबुशा मंगरुळे, प्रतिभा माने हे उपस्थित होते.

### राष्ट्रीय सेवा योजना व बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष रोपण कार्यक्रम

### समाजोपयोगी वृक्षाची लागवड

**डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने चिंच, आंबा, लिंबू व शेवगा आदी समाज उपयोगी वृक्षाची लागवड सामाजिक कार्यकर्त्या रूपाली शहा यांच्या हस्ते करण्यात आले. नालंदा चंदनशिवे यांनी वृक्षाचे महत्त्व विशद केले**

# कॉरिडॉर प्रकल्प बाबत भाजप नगरसेवकांचा आक्षेप, पालकमंत्र्याच्या भूमिकेकडे लक्ष!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोरडॉग प्रकल्पाबाबत भाजप नगरसेवकांचा आक्षेप व पालकमंत्री च्या भूमिकेकडे लक्ष विरोधात भूमिका समोर, पालकमंत्री काय निर्णय घेणार? भाजपला घरचा आहेर मिळाला आहे.

कॉरिडोरला भाजप नगरसेवकांचा आक्षेप, पक्षाच्या भूमिकेवरच सवाल उपस्थित झाला आहे.

भाजपचा घरचा आहेर मिळाल्याची चर्चा शहरात रंगली आहे पक्षाची भूमिका आणि स्थानिक नगरसेवकांची भूमिका यामध्येच विसंगती निर्माण झाल्याचे चित्र समोर आले आहे

कॉरिडोर प्रकल्पाबाबत नागरिकांमध्ये असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांनी विरोधाची भूमिका घेतल्याने पक्ष नेतृत्व समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. एकीकडे विकासाच्या नावाखाली प्रकल्पाची समर्थन आणि दुसरीकडे पक्षाच्या नगरसेवकाकडून त्याला विरोध अशी दुहेरी भूमिका का असा सवाल आज उपस्थित होत आहे.

जनतेच्या भावनांचा विचार करून नगरसेवकांनी विरोध केला असेल तर पक्ष नेतृत्वानेही या भूमिकेकडे दखल घेण्याची गरज आहे स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी जर प्रकल्पाला विरोध करत असतील तर त्या मागील कारणे स्पष्ट करण्याची जबाबदारी भाजपवर आली आहे.

कॉरिडोर मुद्द्यावरून भाजपमध्ये मतभेद असल्याचे चित्र निर्माण झाल्याने आगामी काळात हा विषय अधिक एकट्याची शक्यता आहे भाजपच्या नगरसेवकांचा विरोध म्हणजे पक्षाला पक्षातूनच विरोध मिळालेला इशारा मानायचा का? असा संवाद नागरिकाकडून होत आहे.



### करपलेले सोयाबीन तहसीलदारांना दाखवत अभंग भारुडे गात शासनाकडे केली मदतीची मागणी

# मस्सा (खं) येथे शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मस्सा (खं) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन केले. कळंब-येरमाळा रस्त्यावर शेतकऱ्यांनी ठाण मांडल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. यावेळी शेतकऱ्यांनी करपून गेलेले सोयाबीन हातात घेत अभंग-भारुडे गात शासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली.

रास्ता रोको आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी शेतकऱ्यांनी करपून गेलेले सोयाबीन तहसीलदारांना दाखवून खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आणून दिले. पिकांच्या नुकसानीची तातडीने भरपाई देण्याची मागणीही करण्यात आली.



यावेळी तहसीलदार हेमंत ढोकले यांना शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. निवेदनात दुष्काळ जाहीर करावा, कर्जमाफीची तात्काळ अंमलबजावणी करावी, सोयाबीन, उडीद व मूग या बाधित खरीप पिकांच्या क्षेत्रासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, थकीत पीकविमा तात्काळ वाटप करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

तसेच गावात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, पशुधनासाठी निर्माण झालेला चाऱ्याचा प्रश्न सोडवून चारा उपलब्ध करून द्यावा आणि शेतकरी-शेतमजुरांच्या हाताला काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर भाई बजरंग ताटे, माजी पंचायत समिती उपसभापती विश्वनाथ तांदळे, विक्रम वरपे, अरुण वरपे, जरू वरपे, व्यंकट काळे, विष्णू बांगर, दिनकर वरपे, बाबुराव इंगोले यांच्यासह मस्सा खं गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या मागण्यांवर शासन व प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# पंढरपूरचे सुपुत्र विक्रम नाईक नवरे २४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूरची सुपुत्र विक्रम राजाराम नाईक नवरे भारतीय सैन्य दलामध्ये २४ वर्ष ३० दिवस प्रदीग निष्ठावंत सेवा बजावल्यानंतर नुकतीच सेवा निवृत्ती घेतली व दोन ऑगस्ट २००२ रोजी भारतीय सैन्य दलातील कोअर ऑफ सिग्नल मध्ये दाखल झालेल्या नाईक नवरे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवा काळात विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पडल्या.



सेवानिवृत्तीनंतर भावना व्यक्त करताना त्यांनी आई-वडिलांची प्रेरणा आणि आजींच्या आशीर्वादाने आपण हे कर्तव्य पार पाडू शकलो असेही त्यांनी सांगितले, प्रतीक सेवा काळातील उल्लेखनीय योगदान पंजाब येथे अन्न व पुरवठा निरीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली, ड्रिल इन्स्पेक्टर म्हणून काम केले हिमाचल प्रदेशमध्ये आर. एच. एम., गोवा येथे सी एच एम आणि पंजाब मध्ये सी क्यू एस अशा विविध पदावर सेवा बजावली,

नव्याने भरती झालेल्या रिक्रुट व अधिकाऱ्यांना तसेच जुन्या लिटर ऑफिसर यांना प्रशिक्षण देण्याचे महत्वपूर्ण योगदान बजावले सेवा बजावत असतान अधिक पदवीधेपर्यंत ग्रॅज्युएशन शिक्षण पूर्ण केले.

शवे दरम्यान विविध ठिकाणी उल्लेखनीय कामगिरी बजावली व देश सेवेची २४ वर्षे पदरीकर पूर्ण करून स्वगृही परीक्षेला विक्रम नाईक नवरे यांच्या योगदानाबद्दल पंढरपूर परिसरातील त्यांची अभिनंदन व कौतुक मोठ्या उत्साहात करण्यात आले.

जय हिंद जय भारत